




दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १२७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२० डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी आज मतदान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे वारे वाहत आहेत. २ डिसेंबरला नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूकीसाठी मतदान पार पडले आहे. मात्र २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूका काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्यपदांसाठी; तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १४३ सदस्यपदांच्या जागांसाठी उद्या मतदान पार पडणार आहे. त्यानंतर



२ डिसेंबरसह २० तारखेला होणाऱ्या मतदानाचा निकाल २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष या निकालावर असणार आहे.

**आज मतदान,**
**उद्या २१ तारखेला निकाल**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर केला होता. त्यानुसार ०२ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले. मात्र २३ ठिकाणची निवडणूक काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. मात्र आता या ठिकाणी उद्या म्हणजेत २० डिंसेबरला मतदान पार पडणार आहे. त्यानंतर सर्व संबंधित ठिकाणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. कोणत्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये मतदान होणार?

उद्या म्हणजेच २१ तारखेला ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा या ठिकाणी मतदान पार पडणार आहे. त्याचबरोबर पुण्यातील बारामती, फुरसुंगी-उरुळी देवाची, सोलापूरातील अनगर, मंगळवेढा, साताऱ्यातील महाबळेश्वर, फलटण येथेही मतदान पार पडणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री, नांदेडमधील मुखेड, धर्माबाद, लातूरमधील निलंगा, रेणापूर, हिंगोलीतील वसमत, अमरावतीतील अंजनगावसूर्जी, अकोला जिल्ह्यातील बाळापूर, यवतमाळमधील यवतमाळ, वाशिममधील वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा, वर्ध्यातील देवळी आणि चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथे मतदान पार पडणार आहे.

*** सर्व पक्षांचा जोरात प्रचार !**

राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूकीची तयारी पूर्ण झाली आहे. मतदान अधिकारी मतदान केंद्रावर पोहचण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणूकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. सर्वच मोठे नेते प्रचारात सहभागी झाले होते. त्यामुळे या निवडणुकीतील रंगत आणखी वाढली आहे. आता मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## काळेपाडा गावात पाच-सहा महिन्यांपासून नळपाणी बंद ग्रामस्थांचा संयम सुटला आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१९, शहापूर (ठाणे) :** ग्रामपंचायत खरिवली अंतर्गत काळेपाडा गावात मागील पाच ते सहा महिन्यांपासून नळपाणीपुरवठा पूर्णतः बंद असून, वारंवार तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यावश्यक सुविधेसाठी गावकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या संदर्भात ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, पाणीपुरवठा कर्मचारी तसेच गटविकास अधिकारी यांच्या दालनात बैठका घेऊन निवेदने दिली असतानाही आजपर्यंत नियमित व कायमस्वरूपी नळपाणीपुरवठा सुरू झालेला नाही. या महिन्यात केवळ दहा ते बारा दिवस पाणीपुरवठा सुरू करण्यात आला; मात्र त्यानंतर पुन्हा पाणी बंद झाल्याने परिस्थिती जैसे थे आहे.

पाणीटंचाईमुळे महिलांना, वृद्ध नागरिकांना व लहान मुलांना दूर अंतरावरून पाणी आणावे लागत असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित यंत्रणांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

आज काळेपाडा गावातील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, शहापूर यांना निवेदन देत शेवटचा इशारा दिला आहे. तात्काळ व नियमित नळपाणीपुरवठा सुरू न झाल्यास महिला व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने कार्यालयासमोर मडके फोडो आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस संपूर्ण प्रशासन जबाबदार राहील, अशी स्पष्ट भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे.

## मुदखेड तहसिलची तिन टिप्परवर भरारी पथकाची कारवाई



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांत होणाऱ्या अवैध गौण खणीज उत्खनन व वाहतूकी विरुद्ध महसूल प्रशासनाने कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दि.१७ डिसेंबर रोजी भरारी पथकाचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते त्या नुसार दि. १८ डिसेंबर रोजी भरारी पथकातील नायब तहसीलदार संतोष कामठेकर नायब तहसीलदार विजयकुमार पाटे नायब तहसिलदार समीर पोहणे यांनी मौजे महाटी येथे अवैध रित्या रेतीची वाहतूक करणारे एक टिप्पर क्रं. MH AD 3176 जप्त करून ते तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आले. त्या नंतर आमदूरा येथे मुरुमाचे अवैध रित्या वाहतूक करणारे हायवा क्रं.MH17 BY 7181 जप्त करून तहसील कार्यालयच्या प्रांगणात लावण्यात आले तसेच दि.१९ डिसेंबर रोजी पाथरड येथे रेतीचे अवैध रित्या वाहतूक करणारे एक टिपर क्रं. MH 16 AD 2228 जप्त करून तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आले सदरील कार्यवाही करते वेळस तलाठी मोरे व गलांडे हे उपस्थित होते.

तहसील प्रशासन तर्फे तालुक्यांत होणाऱ्या अवैध उत्खनन व वाहतूक बाबत तिव्र स्वरुपाची मोहीम हाती घेतली असल्याचे तहसिलदार डॉ.आनंद देऊळगावकर मुदखेड यांनी पसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

## महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांकडून यंत्रणेचा आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगर पालिकेची निवडणूक जाहीर होताच महानगर पालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी गुरुवारी संबंधित यंत्रणेचा आढावा घेऊन सुचना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, उपायुक्त संदीप चिद्रवार, पोलिस उपअधिक्षक प्रमोद चौगुले, महावितरणच्या अधिक्षक अभियंता संध्या चिवंडे, वस्तु व सेवा कर विभागाचे उपायुक्त संतोष हेमने, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक नितीन धार्मिक, वाहतूक पोलिस निरीक्षक प्रवीण पाटील, पोलिस निरीक्षक आसिफरजा शेख, परिवहन विभागाच्या विभागीय नियंत्रण स्मिता सुतावणे व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या काळात सर्व संबंधित यंत्रणांनी अतिशय गांभिर्याने आणि जबाबदारीने काम करावे. कोणतीही चूक होऊ देऊ नये.




निवडणूक संदर्भात कोणतीही तक्रार येणार नाही, याची दक्षता घ्यावी. निवडणुकीच्या कामासाठी वेगवेगळे पथक तयार करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. महानगर पालिकेने निवडणूक नियंत्रण कक्ष, विविध परवानग्या देण्यासाठी एक खिडकी योजना त्वरीत सुरू करावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी मनपा आयुक्त अकुनुरी नरेश यांनी सादरीकरणातून स्थापन करण्यात आलेल्या सनियंत्रण समितीचे कार्ये, निगराणी पथके, भरारी पथके, तक्रार निवारण आदींविषयी माहिती दिली.

# पालम शहरात महावितरणचा सावळा गोंधळ !

## सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने पालमकर त्रस्त

**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.१९, पालम (परभणी) :** पालम शहरात दिवसभर सुरू असलेल्या वीजपुरवठ्याच्या लपंडावामुळे नागरिक, दुकानदार, व्यापारी, विद्यार्थी व लघुउद्योगिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. शहरात दररोज कुठल्या ना कुठल्या डीपीवर बिघाड होत असल्याने तासन तास वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे पालमकर त्रस्त झाले आहेत.

शहरात सुमारे ४० पेक्षा अधिक डीपी असून, रोज एखाद्या डीपीवर तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण देत कधी एक-दोन तास तर कधी चार-चार तास वीज बंद ठेवली जाते. उन्हाळा, पावसाळा, गणेशोत्सव, दिवाळी तसेच विविध जयंती व मिरवणुकीपूर्वी मेंटेनन्सच्या नावाखाली दिवसभर वीज बंद ठेवूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली दिसत



नाही. उलट दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. ग्राहकांनी महावितरणकडे विचारणा केल्यास कधी गंगाखेड येथून मुख्य लाईन बंद असल्याचे, कधी एखाद्या डीपीवरील एलटी तार तुटल्याचे, तर कधी ११ केव्ही मेन लाईन ट्रिप झाल्याचे किंवा फिडरवरील लोड वाढल्याचे कारण दिले जाते. काही वेळा ट्रान्सफॉर्मरमध्ये ऑइल टॉप करण्यासाठी वीज बंद केल्याचे सांगितले जाते. मात्र, अशी वेगवेगळी कारणे देत कधी कधी सकाळी साडेसहा वाजल्यापासून दिवसभरात अनेकवेळा वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. या ठिसाळ कारभाराचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांसह दुकानदार, व्यापारी, छोटे-मोठे उद्योग आणि विद्यार्थ्यांना बसत आहे. वीज नसल्याने व्यवसायावर परिणाम होत असून विद्यार्थ्यांचा अभ्यास खोळंबत आहे. दर महिन्याला नियमित वीजबिल भरूनही महावितरणचा हलगर्जीपणा का सहन करायचा, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पालम महावितरण कार्यालयात सहाय्यक अभियंता व उपकार्यकारी अभियंता कार्यरत असतानाही नियोजनबद्ध मेंटेनन्स, फिडरचे लोड बॅलन्सिंग करून शहराला स्थिर वीजपुरवठा का देता येत नाही, असा प्रश्न त्रस्त पालमकर विचारत असून, महावितरणने तातडीने उपाययोजना करून सुरळीत वीजपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

## शरद पवार यांच्या विश्वासू शिलेदाराचा राजकारणातून संन्यास

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, पुणे :** राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू आहे. पुण्यासह राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीची घोषणा झालेली आहे. सर्वच पक्षांनी यासाठी तयारी सुरू केली आहे. विविध पक्ष इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीही घेत आहेत. अशातच आता पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. विश्वासू शिलेदाराने सोशल मीडियावर पोस्ट लिहित राजकारणातून संन्यास घेतला आहे. जरा विसावू या वळणावर या शीर्षकाखाली माजी नगरसेवक विशाल तांबे यांनी एक पोस्ट लिहीत संन्यास घेण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**विशाल तांबे यांचा**
**राजकारणातून संन्यास...**

ऐन महापालिका निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच माजी नगरसेवक विशाल तांबे यांनी राजकारणातून संन्यास घेतला आहे. शरद पवार, सुप्रिया सुळे यांचे निकटवर्तीय असलेल्या



विशाल तांबे यांच्या निर्णयामुळे राष्ट्रवादीला धक्का बसला आहे. विशाल तांबे हे सलग तीन वेळा पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले होते. २००७,२०१२ आणि २०१७ साली त्यांनी धनकवडी परिसरातून विजय मिळवला होता. विशाल तांबे यांनी पुणे महापालिकेचे स्थायी समितीचे अध्यक्षपदही भूषवलेले आहे. यानंतर बोलताना विशाल तांबे यांनी म्हटले की, मी महानगरपालिका निवडणुकांपासून दूर राहणार आहे. मी कुठेही पक्षावर नाराज नाही. १९ वर्ष महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून मी काम बघितले आहे, मात्र आता थांबण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या समोर ही माझी भूमिका मांडली आहे असंही तांबे यांनी म्हटले आहे.




## युक्रेन-रशिया युद्ध होणार?

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाच्या झळा संपूर्ण जगाला बसत आहेत. दोन देशांमध्ये युद्ध सुरू असले तरीही संपूर्ण जग या युद्धामुळे दोन विभागात विभागले गेले आहे. रशिया आणि युक्रेनमधील युद्ध हा एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे, जो सोडवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाही संघर्ष करावा लागला आहे. युक्रेनला रशियाविरोधात युद्ध लढण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी मदत केली हे जाहीर आहे. अनेक शस्त्रे त्यांनी युक्रेनला पुरवली. मात्र, आता त्यांच्याकडून हे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न केली जात आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः रशियन राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली आणि करार करण्यासाठी आपला सर्वात हुशाल सल्लागार रशियाला पाठवला आहे. अमेरिकेचे सध्याचे प्रयत्न बघता रशिया आणि युक्रेनमधील युद्ध थांबण्याची शक्यता आहे. अमेरिकेने जो युद्धबंदीचा पहिला करार रशिया आणि युक्रेनला दिला होता तो करार रशियाने मान्य असल्याचे म्हटले होते. मात्र, त्या प्रस्तावाला युक्रेनने विरोध दर्शवला. युक्रेन संकटावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यासाठी रशियन आणि अमेरिकन प्रतिनिधी पुन्हा एकदा भेटणार आहेत. व्हाइट हाऊसच्या माहितीनुसार, युक्रेनमधील युद्ध संपवण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नवीन प्रस्तावाबद्दल चर्चा करण्यासाठी अमेरिकन आणि रशियन अधिकारी या आठवड्याच्या अखेरीस भेटणार आहेत. ही बैठक फ्लोरिडा राज्यातील मियामी शहरात होईल. अमेरिकन शिष्टमंडळाचे नेतृत्व विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर करतील. रशियन बाजूचे नेतृत्व किरील दिमित्रीव्ह करण्याची शक्यता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रस्ताव सर्व पक्षांना स्वीकारार्ह बनवण्यासाठी आणि युद्ध संपवण्यासाठी आहे. आता दोन्ही देश याला कशाप्रकारे प्रतिसाद देतात, याकडे जगाच्य नजरा लागल्या आहेत. ट्रम्प यांच्या प्रस्तावामध्ये युक्रेनला नाटोसारख्याच सुरक्षा हमी देऊ केल्या आहेत, परंतु रशियाने ताब्यात घेतलेल्या प्रदेशाबाबत अद्याप कोणताही करार झालेला नाही. मात्र, रशियाच्या ताब्यात असलेल्या प्रदेशांसाठी युक्रेन आग्रही आहे. नाटो देशातून युक्रेनला काढावे, असेही रशियाचे म्हणणे आहे. ज्याला थेट विरोध युक्रेनचा आहे. मात्र, सध्याच्या घडामोडींनुसार हे युद्ध थांबवण्याचे संकेत आहेत.

## दगडातून इतिहास साकारणारे शिल्पकार कालवश


आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचे नुकतचं वयाच्या १०० व्या. वर्षी निधन झाले त्यांच्या जाण्याने शिल्पकलेतील छिन्नी आणि हातोडा पोरका झाला आहे भारतातील नामवंत आणि जगविख्यात शिल्पकार म्हणून राम सुतार यांची ख्याती होती गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा त्यांनी उभारला होता. नुकताच त्यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.राम सुतार यांनी २०० हून अधिक भव्य पुतळ्यांची उभारणी करून भारताच्या शिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवून दिली.राम सुतार यांनी स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षा दुप्पट उंच असणारा सरदार वल्लभभाई पटेल यांचा १८२ मीटर उंचीचा भव्य पुतळा उभारला शिल्पकलेत दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना १९९९ साली पद्मश्री आणि २०१६ साली पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते.१९ फेब्रुवारी १९२५ रोजी महाराष्ट्रातील धुळ्याम धील गोंडूर या छोट्याश्या गावी एका गरीब कुटुंबात राम सुतार यांचा जन्म झाला होता. त्यांनी मुंबईच्या 'जेजे स्कूल ऑफ आर्ट'मध्ये शिक्षण पूर्ण केले. १९५२ ते ५८ या काळात तिशीतील राम सुतार यांनी आधी अजिंठा-वेरुळ येथील शिल्पांच्या डागडुजीचे आणि नंतर पंचवार्षिक योजनांचे लाभ सांगणारी लघुशिल्पे बनविण्याचे काम सरकारी नोकरीत राहून केले. राम सुतार यांनी १९६० पासून त्यांचा स्वतंत्र स्टुडिओ उभारला. राम सुतार यांनी आतापर्यंत संसद भवनाच्या आवारातील मौलाना आझाद (१८ फूट), इंदिरा गांधी (१७ फूट), राजीव गांधी (१२ फूट), गोविंदवल्लभ पंत (१० फूट) आणि जगजीवनराम (९ फूट) अशा अनेक मूर्ती घडवल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, इंदिरा गांधी, राजीव गांधी अशा अनेक दिग्गज नेत्यांच्या शिल्पांची निर्मिती त्यांनी केली आहे. फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या ठिकाणीही त्यांनी साकारलेली शिल्पं उभी आहेत. नेत्यांच्या जीवनातील प्रसंगांचे दर्शन घडविणारी भित्तिशिल्पे हेही सुतार यांचे एक वैशिष्ट्य होते अशा या ध्येयवेड्या ज्येष्ठ शिल्पकाराचे निधन मनाला चटका लावणारे आहे त्यांना विनम्र आदरांजली !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# राज्यात जनतेचा विश्वास जिवंत कसा राहणार..?

## ठणठणीत असलेले असे, नेते निकालानंतर अचानक आजारी कसे काय पडतात..?

सत्तेचा वापर आणि गैरवापर यातील सीमारेषा जसजशी पुसट होत चालली आहे, तसतसा जनतेचा राजकारण्यांवरील विश्वास कोलमडत आहे. नाशिकच्या सदनिका घोटाळ्यात दोषी ठरलेले राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे हे याचेच ताजे उदाहरण ठरले आहेत. आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखून ठेवलेली योजना वापरून, स्वतःला गरीब दाखवून, घर मिळवणाऱ्या या मंत्र्याने केवळ कायद्याचा गैरफायदा घेतलेला नाही, तर सार्वजनिक पदाचा अपमान केला आहे.



न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावल्यावरही मंत्रीपद कायम राखले जाणे हे लोकशाहीतील नीतिमूल्यांच्या विटाळाची जाणीव करून देते. कोकाटे यांच्या संपत्तीतील चमत्कारिक वाढ ही त्यांच्या राजकीय प्रवासाची खरी कहाणी उलगडते. दहा वर्षांत ६ कोटींपासून तब्बल ४८ कोटींपर्यंत झेप घेणारी मालमत्ता म्हणजे पारदर्शकतेच्या धबधब्याऐवजी सत्तेच्या सोन्याच्या नळातून वाहणाऱ्या विशेषाधिकारांचे प्रतीक आहे. ज्या व्यक्तीने शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व केले, कृषीखात्याचा कारभार पाहिला, त्याच्यावर अशी कलंकित नोंद लागणे ही शेतकरी वर्गाबरोबर प्रामाणिक सेवकवर्गासाठीही अपमानास्पद बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या खात्यावरून कोकाटेंना मुक्त केले असले, तरी बिनखात्याचे मंत्री म्हणून त्यांचा दर्जा कायम ठेवण्यात आला. हे चित्र म्हणजे जबाबदारी आणि नैतिकता यांच्यातील तडजोड दाखवणारे प्रतीक आहे. एखादा मंत्री न्यायालयीन शिक्षेच्या छायेखाली असताना तो सत्ताकेंद्रात बसलेला दिसतो, तर मग भ्रष्टाचाराविरुद्धच्या भाषणांना काय अर्थ उरतो? फडणवीस सरकारने एका दोषी ठरलेल्या व्यक्तीला मंत्रीपदावर टिकवून केवळ राजकीय सोय पाहिली आहे, जनतेचा ज विश्वास नाही. जनतेच्या पैशावर आणि विश्वासावर उभ्या असलेल्या सत्तेत, अशा वर्तनाला माफी देण्यास जागा नाही. मंत्री हे पद नाही, ती जबाबदारी असते. ती जबाबदारी न पेलणाऱ्या व्यक्तींनी सत्तेपासून दूर राहावे हीच लोकशाहीची खरी कसोटी. कोकाटेंचे प्रकरण हे केवळ एका मंत्र्याच्या गैरकृत्याचे प्रतीक नसून, सत्तेत नैतिकतेचा श्वास उरला आहे का, यावरच प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे.

काही मित्र पक्ष आणि शत्रू पक्ष एकत्र येऊन कोकाटेंना त्रास देत आहेत, असे राष्ट्रवादीतील काही नेते वाहिन्यांवर उघडपणे बोलत आहेत. वास्तविक, कोकाटेंवर केवळ भ्रष्टाचाराचे आरोप झालेले नाहीत, तर त्यांच्यावरचे आरोप न्यायालयात सिद्ध झालेले आहेत. त्यामुळे कोकाटेंना कोणी राजकीय नेते लक्ष्य करीत आहेत असे म्हणणे पूर्णतः बिनबुडाचे ठरते. या पार्श्वभूमीवर कोकाटेंना समर्थन देणे ही बाब भ्रष्टाचाराला समर्थन देण्यासारखी आहे. खरे तर कोकाटेंच्या विरोधात न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देऊन पुढील कायदेशीर प्रक्रियेला प्रामाणिकपणे सामोरे जायला हवे होते. मात्र तसे न करता ते प्रक्रियेपासून दूर पळत राहिले इतकेच नाही, तर आरोग्याचे कारण देऊन लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. ठणठणीत असलेले असे नेते निकालानंतर अचानक आजारी कसे पडतात आणि हॉस्पिटल त्यांना दाखल कसे करून घेते, या बाबीचीही चौकशी व्हायला हवी. आता कोकाटेंच्या जागी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. असे झाले तर हे दृश्य राज्याच्या राजकीय संस्कृतीवर काळा ठिपका उमटवणारे ठरेल. ज्या मुंडेंवर अद्याप देशमुख खूनप्रकरणाचे ढग कायम आहेत, आणि ज्यांची निर्दोषता न्यायालयीन चौकशीत सिद्ध झालेली नाही, त्या व्यक्तीचे नाव पुन्हा मंत्रिपदासाठी पुढे येणे ही बाब राजकीय नैतिकतेला काळीमा फासणारी आहे. ज्या राज्यात भ्रष्टाचार आणि गुन्ह्यांच्या सावल्या अंगावर घेऊन मंत्रीपदाची चर्चा होते, त्या राज्यात जनतेचा विश्वास जिवंत कसा राहणार? भाजप आणि राष्ट्रवादी यांच्या युतीने बनलेल्या या सरकारकडून किमान शुचिता, जबाबदारी आणि सार्वजनिक प्रतिमेचा आदर अपेक्षित होता. पण वास्तव उलट घडत आहे. कोकाटेंना मंत्रीपदावर ठेवून त्यांच्याकडून केवळ खाते काढणे हा नैतिकतेचा अपमान होता, आणि आता त्यांच्या जागी अशा व्यक्तीचा विचार होणे, ज्यांना अजून स्वच्छ प्रतिमा मिळालेली नाही, हे सरळसरळ जनतेचा विश्वास उडवणे आहे.

दोषसिद्धीपूर्वी निर्दोषतेचा फायदा देणे योग्य असू शकते, पण त्यावर आधार ठेवून जबाबदारीचे पद देणे हे जनतेच्या न्यायबुद्धीचा अपमान आहे. कोकाटेंसारखा दोषी मंत्री आणि अजून क्लीन चिट मिळालेली नाही अशा मुंडेंच्या मंत्रिपदाच्या चर्चेतील समानता म्हणजे, सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने अपराध आता अडथळा नसून, काही वेळा पात्रतेचाच भाग बनला आहे. ही विचारसरणी लोकशाहीला नष्ट करणारी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आता संतुलनाचे, जबाबदारीचे आणि नीतिनियमांचे जेवढे उच्चार होतात, तेवढेच त्यांचे उल्लंघन दिसते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि त्यांच्या पक्षांनी स्वतःच्या कृतींचा आरसा समोर ठेवावा. भ्रष्टाचाराविरुद्धच्या भाषणांनी पोट भरत नाही.

राजकीय नैतिकता कृतीतून दिसायला हवी. पण सध्याचे सत्ताधारी पक्ष जनतेला जी प्रतिमा दाखवत आहेत, धनंजय मुंडे यांच्या नावाची चर्चा अजूनही थांबत नसेल, तर ती फक्त त्यांच्या प्रभावामुळे नाही, तर सत्तेतील 'पारस्परिक सोयी' या अदृश्य समझोत्यामुळे आहे. अशी सोयच अखेर महाराष्ट्राच्या राजकारणाला सर्वस्व गमवायला लावते. महाराष्ट्राची जनता मूर्ख नाही. ती पाहते, ऐकते आणि लक्षात ठेवते. आज कोकाटे गेले, उद्या मुंडे येतील, पण प्रश्न एकच राहील. नेमके कोण चालवत आहे हे राज्य ? जनता की काही मोजके सत्तापिपासू राजकारणी...?

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर.**

# मुंबई महानगरपालिका १५३ वर्षाच्या ऐतिहासिक सभागृहात कोण बाजी मारणार !

## वाचक पत्र

मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे.२०२२ मार्च ७ रोजी आधीच्या सभागृहाची मुदत संपली. ८ मार्च पासून महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू झाली होती. या आधी १९८४ साली सहा महिने प्रशासकीय राजवट होती.द.म.सुखटणकर त्यावेळी आयुक्त होते.

त्यांनीच प्रशासकीय कारभार सांभाळला होता. राज्य निवडणूक आयोगाने मुंबई महानगरपालिका निवडणूक जाहीर केली आहे. जानेवारी २०२६ महिन्यात निवडणूकीचे सोपास्कार पूर्ण होऊन नवीन सभागृह भरेल. जुने, नवे नगरसेवक मुंबई महानगरपालिका सभागृहात येतील. ऐतिहासिक सभागृहाने महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळात, भारताच्या संसदेत अनेक कर्तबगार लोकप्रतिनिधी दिले त्यांनी मुंबई महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल केले आहे. २०२६ च्या निवडणूकीत गौरवशाली ऐतिहासिक सभागृहात विद्वान लोकप्रतिनिधी येतील अशी अपेक्षा करूया.

४ सप्टेंबर १८७३ रोजी मुंबई महानगरपालिका सभागृहात पहिली सभा भरली होती. विविध पक्षाच्या नगरसेवकांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला त्यापैकी तत्कालीन नगरसेवकांची नव्याने सभागृहात येणार्या नगरसेवकांना माहिती असावी त्यांनीही त्यांच्या सारखे मुंबई महानगरपालिका सभागृहात अभ्यासपूर्ण कामकाजात करावे, मुंबईकरांना चांगल्या सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अशी माफक अपेक्षा आहे.

तत्कालीन सभागृहातील मान्यवर मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, कमल देसाई, दत्ताजी साळवी, वामनराव महाडिक, मनोहर जोशी, आर.के.गणात्रा, नाना लाल मेहता, अलका देसाई, इंदूमती पटेल, पार्वती परिहार, भारतीबेन शेट्ये, डॉ.शांती पटेल, डॉ.दिवाण, राजाभाऊ मिराशी, छगन भुजबळ, आर.आर.सिंग, नारायण राणे, शरद आचार्य, डॉ.रमेश प्नभु, दिनकर झारापकर, रामदास नायक, प्रेमकुमार शर्मा, जयवंतीबेन मेहता, आर.टी.कदम, दत्ताजी नलावडे, विलास अवचट, नंदकुमार साटम, अनंत गीते, निर्मला प्रभावळकर, विवेक खाडे, रमेश जोशी, संभा चव्हाण, मधु चव्हाण, रुस्तम तिरंदाज, गोपाळ शेट्टी, विश्वनाथ नेरुरकर, रविंद्र पवार, राजेंद्र प्रसाद चौबे, सुनिल प्रभू, अनंत नर इत्यादी नगरसेवकांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला होता. नव्या सभागृहात येणारे लोकप्रतिनिधी कर्तबगार म्हणून लौकिक मिळवून सभागृहाचे नावलौकिक करतील अशी आशा व्यक्त करू या.

**- महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई ९८६९४७६२०९**

## बाबा किर्तनी

गाडगेबाबा किर्तनी
व-हाडी भाषा बोली
ऐकताना शब्द शब्द
जाणवे माया ओली

वर्ण भेद जात पात
अलगद दूर सारली
अंधश्रध्दा ठासलेली
किर्तन रंगात विरली

आशय निर्मल असा
स्पष्टपणे दिसेखोली
प्रकाशयात्रा चालली
हरेक कवाडे खोली


भजनात सूर साजरे
सहजतेवाजते टाळी
नादभरला निनादात
ब्रह्मानंदे लागी टाळी

सोपे वाटे शब्द अर्थ
जनता रंगात रंगली
संपले किर्तन जेंव्हा
समाधीमाझी भंगली

शतके जरी लोटली
गोडी अवीट वाटली
दश सूत्री मौल्यवान
विचार धारेत दाटली

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# कर्मयोगी संत गाडगे महाराज



महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला.

ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले.

अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६९ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

अक्षराज



# थोडक्यात

## जरंडी येथे ‘ॲनिमिया मुक्त गाव’ मोहीम

**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.१८, सोयगाव :** मुख्यमंत्री समृद्धपंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत जरंडी (ता. सोयगाव)येथे गुरुवारी (ता.१८) 'ॲनिमिया मुक्त गाव' ही महत्त्वाची आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात आली. गावातील महिला वर्ग, तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये ॲनिमिया या आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या शिबिरात डॉ. सचिन पवार यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. ॲनिमिया म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे तसेच योग्य आहार व जीवनशैलीतून या आजारापासून कसे मुक्त राहता येईल, याबाबत त्यांनी माहिती दिली. विशेषतः महिलांमध्ये व किशोरवयीन

मुलींमध्ये ॲनिमियाचे प्रमाण अधिक असल्याने आयर्नयुक्त आहार, हिरव्या पालेभाज्या, डाळी, फळे व आवश्यक पूरक औषधांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. या आरोग्य शिबिरात इतर आजारांचे प्राथमिक निदान कसे करता येईल, वेळेवर तपासणी व उपचार का गरजेचे आहेत, याविषयीही माहिती देण्यात आली. शिबिरात डॉ. दीपक पाटणी, डॉ. सचिन पवार यांच्यासह सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील,सदस्य वंदनाताई पाटील,दिलीप पाटील,मधुकर पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे,आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.आरोग्य विभागाच्या चमुने नागरिकांच्या आरोग्य तपासण्या करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

ॲनिमिया मुक्त गाव मार्गदर्शन शिबिर यशस्वीपणे पार पडले. या कार्यक्रमास ग्राम पंचायत अधिकारी सुनिल मंगरुळे, संतोष पाटील,सतिष बाविस्कर, भास्कर निकम्, अंबु राठोड, सर्व कर्मचारी व सर्व पदाधिकारी यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शविली. तसेच गावातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रोगनिदान शिबिराचा लाभ घेतला. महिलांनी ॲनिमियामुक्त राहण्यासाठी आवश्यक संदेश आत्मसात केल्याने या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला.

## मुळेवाडी रस्त्याची दुरवस्था; नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, धाराशिव :** मुळेवाडी गावाकडे जाणारा मुख्य रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, त्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांसाठीही धोका निर्माण झाला आहे.

या रस्त्यावरून दररोज शालेय विद्यार्थी, शेतकरी, कामगार व रुग्णांची ये-जा होत असते. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असून चारचाकी वाहनांचेही नुकसान होत आहे.

ग्रामस्थांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत व कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष देऊन मुळेवाडी रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## मुर्टी ग्रामपंचायतीतर्फे कर भरण्याचे आवाहन

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१९, मुर्टी :** मुख्यमंत्री समद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मुर्टी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कदात्यांनी कराची थकबाकी ३१ डिसेंबर पुर्वी भरण्याचे आवाहन मुर्टी ग्राम पंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

करात शासनाने ५० टक्के सवलत दिली आहे .ग्रामपंचायत कर ३१ डिसेंबर नंतर भरला तर तो कर संपुर्ण भरावा लागेल असे मुर्टी गावच्या सरपंच कोमल प्रशांत जगताप, उपसरपंच किरण जगदाळे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती रोहीणी पवार व सदस्य यांनी केले आहे. ग्रामपंचायतीने कर भरुन ही सवलत मिळावी असे आवाहन मुर्टी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले.

## रयत इंग्लिश मिडिअम स्कूलच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल संपन्न




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१९, खंडाळा (सातारा) :** रयत इंग्लिश मिडिअम स्कूल, शिरवळ येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी विद्यालय सातारा येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटर, इनोव्हेशन सेंटर वर्ये तसेच छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट दिली.

सहलीची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी विद्यालय सातारा आर्टिफिशल इंटेलिजन्स सेंटरला भेट दिली.येथे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक उपक्रम, संशोधन व अभ्यासाशी संबंधित माहिती मिळाली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी इनोव्हेशन सेंटरला भेट देऊन नवनवीन तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रकल्प व सर्जनशील कल्पनांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी शाळेने या सहलीचे आयोजन केले होते.यानंतर सहलीतील मुख्य आकर्षण असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाला भेट देण्यात आली. संग्रहालयात विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची,शौर्याची व इतिहासाची सविस्तर माहिती मिळाली.ऐतिहासिक वस्तू, चित्रे व माहितीफलक पाहून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण झाली. ही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व आनंददायी ठरली. सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. या सहलीमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे मॅडम आणि पर्यवेक्षिका वासंती घाडगे मॅडम यांचे मोलाचे योगदान लाभले.

## निवडणूक तयारीबाबत महानगरपालिकेची विविध विभागांसोबत आढावा बैठक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, पनवेल :** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल महानगर पालिकेकडून जोरदार तयारी सुरू असून आज पोलीस प्रशासन तसेच शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक पार पडली. यावेळी निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी यावेळी बैठकीत चर्चा झाली. रोख रक्कम, दारू तसेच अमली पदार्थ याच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी चेकपोस्ट ची उभारणी, भरारी पथके, व्हिडीओ पथकांचा प्रभावी वापर इत्यादी बाबींवर चर्चा झाली. यावेळी मुंबई झोन ३ चे उपायुक्त दिपक मोहिते आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत




ही चर्चा झाली.

महावितरणच्या अधिकाऱ्यांना यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांसोबत समन्वयाने विद्युत व्यवस्थेचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व मतदान केंद्रांच्या आजूबाजूला विद्युत व्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने यावेळी चर्चा करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या अनुषंगाने व्यवस्था राबविण्याबाबत चर्चा करताना आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता देण्याविषयी खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या. कोणतेही नवीन बांधकाम किंवा उद्घाटन कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

बँक तसेच वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना रोख रकमेचे आरहन व नियंत्रण, खात्यांचे व्यवस्थापन याबाबतच्या निवडणूक काळात देण्यात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संशयास्पद व्यवहारांबाबत दक्ष राहण्याबाबत यावेळी सांगण्यात आले.

एक खिडकी योजना

निवडणुकीसंबंधातील विविध प्रकारच्या व्यवस्थांमध्ये समन्वयासाठी तसेच सर्व प्रकारच्या सुविधा व परवानग्या तात्काळ पुरविण्यात याव्यात यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांच्या स्तरावर व्यवस्था करण्यात आली असून एकल खिडकी योजना राबविण्यात येणार आहे. अशी माहिती निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांनी दिली.

या बैठकीस निवडणूक अधिकारी तथा आयुक्त पनवेल महानगरपालिका, निवडणूक विभाग उपायुक्त, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीशी संबंधित पनवेल महानगरपालिका व शासनाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांच्या स्तरावर सर्व प्रकारची यंत्रणा सज्ज असून सर्व शासकीय विभागांनी उत्तम समन्वय राखून सहकार्याने काम करावे. असे निवडणूक अधिकारी तथा पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले.

## पाटण विधानसभा मतदारसंघात विकास कामांसाठी दुसऱ्या टप्प्यात अडीच कोटींचा निधी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१९, पाटण :** राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाध्यक्ष व आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या माध्यमातून ग्रामविकास खात्यातून भाजपा राज्य परिषद सदस्य आणि सातारा जिल्हा बँक संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांच्या मागणीवरून पाटण विधानसभा मतदारसंघातील दुसऱ्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली आहे. उर्वरीत विकासकामांनाही लवकरच टप्प्याटप्प्याने मंजुरी मिळेल अशी माहिती भारतीय जनता पार्टी पाटण जनसंपर्क कार्यालयाकडून एका पत्रकाद्वारे प्रसिद्धीस देण्यात आली.

या पत्रकात पुढे म्हटले आहे की पाटण विधानसभा मतदारसंघासाठी मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री ना जयकुमार गोरे यांचे कडून पहिल्या टप्प्यात ५ कोटी २०



लाख रुपयांची विकास कामे मंजूर झाली होती. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मा सत्यजितसिंह पाटणकर यांनी मागणी केलेल्या कामांना मंजुरी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांसह राज्यातील अनेक मंत्र्यांनी दिले होते. त्यानुसारच आता ग्रामविकास खात्याकडून दुसऱ्या टप्प्यात मंजूर झालेल्या अडीच कोटींच्या विकास कामांमध्ये पाटण विधानसभा मतदारसंघातील केरळ येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण १० लक्ष, बिबी येथे सामाजिक सभागृह बांधणे१५ लक्ष, विरेवाडी ग्रामपंचायत इमारत १५ लक्ष, शिंगणवाडी येथील गणपती रामचंद्र पवार यांचे घर ते निवास निवृत्ती पवार यांचे घरापर्यंत रस्ता सुधारणा १० लक्ष, कोंडावळे अंतर्गत बावीचावाडा, चाफ्याचा खडक येथे स्मशानभूमी बांधणे १० लक्ष, दिवशी खुर्द येथे आरल रस्ता ते ग्रामपंचायत कार्यालय रस्ता कॉंक्रीटीकरण १० लक्ष, चाफोली अंतर्गत रस्ता सुधारणा १० लक्ष, पिंपळोशी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता सुधारणा १० लक्ष, संभाजीनगर (वेखंडवाडी ) सभामंडप १० लक्ष चिंचेवाडी मारूती मंदीर परिसर सुशोभिकरण ५ लक्ष, कोंजवडे स्मशानमुमी जवळ कंपाउड ५ लक्ष,

तोंडोशी पाण्याचा घाट बांधणे १० लक्ष, ढोरोशी येथे अंतर्गत रस्ता सुधारणा १० लक्ष, मंदुळकोळे जोतिबा मंदीर से स्मशानभूमी रस्ता सुधारणा १० लक्ष, जानुगडेवाडी अंतर्गत रस्ता सुधारणा व गटर्स बांधणे१० लक्ष, कोरिवळे अंतर्गत रस्ता सुधारणा १० लक्ष, ठोमसे अंतर्गत गणेवाडी येथील रस्ता सुधारणा १० लक्ष, मल्हारपेठ ( पवारआळी) विठ्ठल वार्ड क्र. ४ येथे विठ्ठल मंदिर पारिसर सुशोभिकरण १० लक्ष,

कुसरुंड अंतर्गत विठ्ठल वार्ड येथे सभामंडप १० लक्ष, डेळेवाडी येथील मथुरादास मंदीराकडे जाणारा रस्ता सुधारणा १० लक्ष, त्रिपूडी येथील मातंग वस्ती येथे अंतर्गत रस्ता सुधारणा व गटर्स बांधणे १० लक्ष,

सुपुगडेवाडी (मुळगाव सुपुगडे वार्ड) अंतर्गत रस्ता सुधारणा १० लक्ष, सुळेवाडी येथे अंतर्गत रस्ता सुधारणा१० लक्ष, वाटोळे येथे स्मशानभूमी सुशोभिकरण करणे व प्रतिक्षा शेड बांधणे १० लक्ष, मणदुरे अंतर्गत मारगवाडी रस्ता सुधारणा १० लक्ष असा एकूण दोन कोटी पन्नास लाखांचा निधी ग्रामविकास खात्यामार्फत ना. जयकुमार गोरे यांनी मंजूर केला असल्याची माहिती भाजपा जनसंपर्क कार्यालय पाटण यांचेकडून देण्यात आली आहे. सत्यजितसिंह पाटणकर यांनी मागणी केलेल्या उर्वरित विकास कामांनाही लवकरात लवकर मंजुरी व निधी देण्यासंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे आदी मंत्री महोदयांनीही आश्वासन दिल्याची माहितीही भाजपा जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## पारनेर भूमीअभिलेखमधील प्रलंबित २१४ प्रकरणांसाठी ८४ अधिकाऱ्यांची नेमणूक

### वर्षानुवर्षांचे शेतकऱ्यांचे हेलपाटे थांबणार – शरद पवळे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१९, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील शेतरस्त्यांच्या वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्नांना अखेर गती मिळाली असून, तब्बल २१४ शेतरस्ता मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी ८४ अधिकाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली. शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व सुरेश वाळके यांनी दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर करून, पारनेर तालुक्यात शेतकरी शेतरस्त्यांच्या प्रश्नासाठी वारंवार भूमी अभिलेख कार्यालयात हेलपाटे मारत असूनही त्यांना न्याय मिळत नसल्याची तीव्र व्यथा मांडली होती. या निवेदनाची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख संजय कुंभार यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख, पारनेर यांना तातडीचे व स्पष्ट




निर्देश दिले आहेत. या आदेशानुसार पारनेर तालुक्यातील सर्व प्रलंबित शिवपानंद शेतरस्त्यांच्या प्रकरणांचा सखोल आढावा घेऊन विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. कोणतेही मोजणी प्रकरण प्रलंबित राहू नये, याबाबत दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले असून, मोजणी पूर्ण झालेल्या प्रकरणांचा सविस्तर अहवाल महसूल विभागाकडे सादर करण्यात येणार आहे.

दरम्यान, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील ८४ कर्मचाऱ्यांच्या सेवेतून पारनेर तालुक्यात विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, २१४ प्रलंबित शेतरस्ता मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख, पारनेर यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, शेतरस्त्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. पुढील काळात उर्वरित प्रकरणांसाठीही सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवून ‘झिरो पेंडन्सी’ अभियान यशस्वी करण्याचा निर्धार असल्याचे शरद पवळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. भविष्यात कोणत्याही शेतकऱ्याला वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी सक्षम अधिकारी व कर्मचारी नियुक्तीसाठी पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## जोपर्यंत पाणी मिळणार नाही तोपर्यंत मतदान करणार नाही ; रहिवाशांचा सरकारला इशारा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १९, निघूगाव (ठाणे) :** १४ गावांमध्ये असलेल्या निघू गावातील मेरा घर कॉ. हौ.सो. लि निघू गावातील सोसायटीतील रहिवासीनी अधिकाऱ्यांना आणि राजकीय नेत्यांना निवेदन देऊन थकले. ४ ते ५ वर्षे होऊन सुद्धा पाणी रहिवाशांना मिळत नाही.

अर्ज विनंत्या करून थकलो, आता पाणी नाही मतदान नाही, निघू गावातून पाण्यासाठी वाळीत टाकलेली सोसायटी मेरा घर कॉ. हौ. सो. लि निघू गावाच्या सोसायटीचा कधी संपणार हा




वनवास असा पोस्टर घेऊन ३५ ते ४० कुटुंबांनी एकत्र येत आपला व्यथा मांडल्या आहेत. जोपर्यंत पाणी मिळत नाही तोपर्यंत मतदान करणार नाही असा त्यांनी निश्चय केला आहे. दररोज २०,००० हजार पाणी त्यांना विकत घ्यावे लागत आहे. त्यासाठी दररोज ५००० हजार रुपये त्यांना मोजावे लागत आहे. पाण्यासाठी पिंपरी गावात त्यांना जावे लागत आहे. रहिवासांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे विनंती केली आहे.

ग्रामपंचायत पाणी समिती आमदार खासदार या सर्व अधिकाऱ्यांना रहिवाशांनी निवेदन दिले आहेत तरीसुद्धा प्रशासन याची दखल घेत नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री याची दखल घेणार अशी रहिवाशांना खात्री आहे.

# अखेर ....! त्या अन्नत्याग आंदोलनाची सांगता

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दाव्यांच्या मंजुरीसाठी गेल्या २४ दिवसांपासून सुरू असलेल्या अन्नत्याग उपोषणाची अखेर सांगता झाली आहे. वनहक्क प्रश्नांबाबत प्रशासनाकडून तातडीने केलेले ७ वैयक्तिक वनहक्क दावे व एक सामुहिक वनहक्क दाव्याचे आदेश व उर्वरित दावे एक महिन्याच्या कालावधीत पुर्ण करणार असल्याचे लेखी पत्र व कार्यवाही अहवाल देण्यात आल्यानंतर आंदोलनकर्ते जगन येलके यांनी आपले चोविस दिवसांपासून सुरू असलेले अन्नत्याग उपोषण व आंदोलन मागे घेतले आहे. यावेळी भाजपा ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष हरीष शर्मा यांनी जगन येलके यांना लिंबूपाणी पाजून अन्नत्याग उपोषण मागे घेण्यात आले.

आंदोलनामुळे वनहक्क दाव्यांच्या प्रक्रियेला गती मिळाली असून, प्रलंबित दाव्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.देवई, भटारी, केमारा या गावांना वनग्राम मधून काढून त्यांचे वनहक्के दावे तात्काळ मंजूर करून सामुहिक व वैयक्तिक पट्टे देण्यात यावे, या प्रमुख मागणीला घेऊन गोंडवाना आंदोलन आदिवासी चळवळ संघटनेचे संस्थापक जगन येलके यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयासमोर २४ दिवसांपासून



अन्नत्याग उपोषणावर बसले होते.

या दरम्यान विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाने अनेकदा प्रयत्न केले. मात्र आंदोलकांचे समाधान न झाल्याने आंदोलन २४ दिवसांपर्यंत सुरू राहिले.यादरम्यान आंदोलनकर्त्यांनी दि.९ डिसेंबरला सुद्धा ३ तास रस्ता अडवून ठेवला होता. मात्र, कोणतीही भुमिका प्रशासनाने न घेतल्याने संतापलेल्या आंदोलनकर्त्यांनी दि.१८ डिसेंबरला पुन्हा रस्ता रोको आंदोलन केले. दहा तास पुर्ण वाहतूक बंद होती. प्रशासनाने तातडीने मोहाडा (रै.) येथील सात वैयक्तिक वनहक्क दाव्यांचे पट्टे व चेक आष्टा गावाला सामुहिक वनहक्क दाव्यांसाठी कक्ष क्रमांक ९६ मधील २० हेक्टर जमीन देण्यात आली. यासोबतच केमारा, भटारी, देवई या गावातील ४२ दाव्यांपैकी १८ प्रकरणे उपविभागीय अधिकारी गोंडपिपरी यांच्याकडे पाठविण्यात येणार असल्याचेलेखी पत्र व कार्यवाही अहवाल दिल्यानंतर उपोषण व आंदोलन घेतले मागे घेण्यात आले. व चोविस दिवसांपासून सुरू असलेले जगन येलके यांच्या अन्नत्याग उपोषणाची व आंदोलनाची सांगता झाली. या संघर्षामुळे वनहक्क दाव्यांच्या प्रश्नाला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकाडे, आ. सुधीर मुनगंटीवार यांचे स्वीय सहाय्यक संजय राईंचवार, भाजपा ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष हरीष शर्मा, तहसीलदार मोहनिश शेलवटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजीत आमले, सहाय्यक वनसंरक्षक आदेशकुमार शेंडगे, वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर गौरकार, ठाणेदार राजकमल वाघमारे, नायाब तहसीलदार रामकृष्ण उईके, दिपाली आत्राम, नगराध्यक्ष सुलभा पिपरे, पोलिस निरीक्षक सुमीत परतेकी, भाजपा तालुकाध्यक्ष हरिष ढवस, सामाजिक कार्यकर्ते गणेश परचाके, उपनगराध्यक्ष अजित मंगळगिरीवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष कुमरे, गुरुदास पिपरे, बंडू बुरांडे, ईश्वर नैताम आदी उपस्थित होते. २४ दिवसांपासून सुरू असलेल्या अन्नत्याग उपोषणाची प्रशासन दखल घेत नाही. यामुळे उपोषणकर्ते आदिवासी नेते जगन येलके यांचे समर्थक व आदिवासी बांधवांनी गुरुवारी पहाटे ५ वाजल्यापासून पोंभुर्णा-चिंतलधाबा मार्ग रोखून धरले होते. यामुळे वाहतूक १० तास रोकल्या गेली होती. शाळेच्या बसेस तिथून जाऊ देण्यात आले होते. यादरम्यान कोणतीही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज होते. साधारण दोनशेहून अधिक पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कोणाचे देण्यात आले वनहक्क दाव्यांचे पट्टे!

पोंभूर्णा तालुक्यातील मोहाडा (रै.) येथील प्रभाकर कोवे, सुरेश कोवे, दिवाकर आत्राम,पत्रू घोडाम, नागेंद्र कोवे, एकनाथ कोवे, आनंदराव कोवे यांना वैयक्तिक वनहक्क दाव्यांचे पट्टे देण्यात आले आहे. तर चेक आष्टा गावाला वनविभागाच्या कक्ष क्रमांक ९६ मधील सामुहिक वनहक्क दाव्याचा २० हेक्टर जमीनाचा पट्टा देण्यात आला आहे.

# कीटकनाशक फवारणी करताना शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१९, पेन (रायगड) :** राज्यात, जिल्ह्यात किड नियंत्रणासाठी वेगवेगळ्या रासायनिक व धोकादायक कीटकनाशकाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. कीटकनाशकांच्या अयोग्य मात्रा, अयोग्य मिश्रण, अयोग्य हाताळणी इत्यादीमुळे शेतकरी व शेतमजूर यांना विषबाधेच्या घटना घडतात. पर्यायाने त्यांचा मृत्यू ही ओढवतो. त्यासाठी याबाबत वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन कृषी मोहीम अधिकारी महेश नारायणकर यांनी केले.रायगड जिल्हा परिषदेच्या यांच्या नेतृत्वाखाली रोहा येथे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन कीटकनाशके हाताळणी कशी करावी. फवारणी करतांना कोणती काळजी घ्यावी. याविषयी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मोहीम अधिकारी यांनी बोलतांना सांगितले की, कीटकनाशके खरेदी करताना गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करून पावती घ्यावी खरेदी केलेल्या कीटकनाशकांचे वेष्टन/पिशवी, खरेदीची पावती व थोडे कीटकनाशक जपून ठेवावे.

कीटकनाशक लेबलवर बॅच क्रमांक, नोंदणी क्रमांक, उत्पादनाची तारीख व अंतिम मुदत तपासूनच सीलबंद असलेले कीटकनाशक खरेदी करावे. कीटकनाशक बंद कुलूप असलेल् हवा खेळती असलेल्या ठिकाणी ठेवावे. एका विशिष्ट क्षेत्रासाठी आवश्यक तेवढेच कीटकनाशक खरेदी करावे, कधीही अन्नाच्या वस्तू फळे भाज्याबरोबर वाहतूक करू नये, मूळ पॅकिंग मधील डब्यात/पॅकेट मध्येच ठेवा, कीटकनाशक वापर करताना शिफारस केलेल्या डोस प्रमाणे द्रावण तयार करावे व वापरण्यापूर्वी डबा/पॅकेट वरील सूचना काळजीपूर्वक वाचावे असे यावेळी सांगितले.

**शेतकऱ्यांनी फवारणी करतांना ही घ्यावी काळजी**

द्रावण तयार करताना काठीचा वापर करावा व नेहमी स्वच्छ पाणी वापरावे. कीटकनाशक हाताळताना मिश्रण तयार करताना व फवारणी करताना संपूर्ण शरीर झाकण्यासाठी संरक्षक कपडे उदा. हातमोजे, फेसमास्क, गॉगल, पायात बूट, एफ्रान, पूर्ण पायघोळ संरक्षित किट



चा वापर करावा, फवारणी करण्यासाठी योग्य उपकरणे निवडा, कीटकनाशक व तणनाशकसाठी वेगळे फवारणी यंत्र वापरावे, फवारणी न्याहरी जेवण करूनच करावी रिकाम्या पोटी फवारणी करू नये.

तसेच फवारणी करताना कोणतेही पदार्थ खाणे/व्यसन टाळावे, फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी वारा शांत असताना करावी व वाऱ्याच्या विरुध्द दिशेने फवारणी करू नये, शिफारस केलेल्या स्प्रेअरचा वापर करावाफवारणीनंतर स्प्रेअर व उपकरणे, वापर केलेले कपडे डिटर्जंट /साबणाने स्वच्छ धुवावे व हात पाय चेहरा साबणाने स्वच्छ धुवून घ्यावेवापरलेले डबे/ पॅकेट ठेचून पाण्याच्या स्रोत पासून दूर जमिनीत गाढून टाकावेत त्याचा पुनर्वापर करू नयेकीटकनाशके फवारलेल्या शेतात जनावरांना कमीत कमी १५ दिवस चरायला सोडू नये.

कीटकनाशकांचा संपर्क आल्यानंतर डोळ्याचा क्षोभ, डोकेदुखी, डोळ्यातून पाणी येणे, धाप लागणे, उलटी, घाम येणे, जळजळणे ई.लक्षणे दिसल्यास प्रथमोपचार करावा तसेच रिकामा डबा/ पॅकेट लेबल सोबत घेऊन डॉक्टर यांना दाखवा. अन्यथा रुग्णाच्या जीवाला धोका होऊ शकतो.त्वचेवर कीटकनाशक सांडल्यास १५ मिनिटे त्वचा धावत्या पाण्याखाली साबणाने स्वच्छ धुवावेत. डोळ्याची संपर्क आल्यास डोळे १५ मिनिटे पाण्याने स्वच्छ धुवा.

# जानकाई विद्यालयात ५३ वे कळवण तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उद्घाटन संपन्न

**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.१९, कळवण (नाशिक) :** शिक्षण विभाग कळवण व पंचायत समिती कळवण तसेच तालुका व विज्ञान व गणित अध्यापक संघ व जानकीबाई एज्युकेशन सोसायटी संचलित जानकाई प्राथमिक व माध्यमिक विद्यालय कळवण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे कळवण तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन कळवण सुरगाणा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार नितीन भाऊ पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच जानकाई विद्यालयाच्या गीतमंचाने मान्यवरांचे स्वागत गीत गावून स्वागत व सत्कार केले व विज्ञान गीत सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी परशराम महाले साहेब यांनी केले. कळवण शहरातील उद्योजक विलास शिरोडे यांनी आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान व एआय तंत्रज्ञान यांच्याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.बी. जोशी यांनी स्वागतपर मनोगत केले. तसेच तालुक्यातील निवडक विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन व संकल्पना यांविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार नितीन भाऊ पवार यांनी आपल्या मनोगतातून स्वामी विवेकानंद व डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या विचारांचे महत्व सांगुन विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा असे प्रतिपादन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत कोठावदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यालयाचे सुत्रसंचालन विद्यालयाचे शिक्षक आर.एस.अमृतकार यांनी केले.या कार्यक्रमाप्रसंगी

खगेन्द्र टेंभेकर(पोलिस निरीक्षक), चव्हाण साहेब(विस्तार अधिकारी




कळवण), चौधरी साहेब( विस्तार अधिकारी), सर्व केंद्राचे केंद्रप्रमुख, कळवण तालुका पत्रकार संघ, मुख्याध्यापक संघाचे पी.एम.बागुल सर, प्राथमिक मुख्याध्यापक संघाचे जिभाऊ निकम सर, आर.के.एम विद्यालयाचे मुख्याध्यापक जी.डी. रौदळ सर, जानकाई प्राथमिकचे मुख्याध्यापक एच.व्ही दशपुते सर, जनता विद्यालय नाकोडेचे मुख्याध्यापक एन.आर. पाटील सर, विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष विकास रौंदळ सर व सर्व सदस्य मंडळ, तसेच सर्व विद्यालयांचे मुख्याध्यापक विज्ञान शिक्षक व मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते.

तसेच जानकाई विद्यालयाचे विज्ञान गणित व भूगोल छंद मडळाचे सदस्य, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### खापरखेडा येथे बँक ऑफ इंडियाचा ग्राहक संपर्क मेळावा संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्याच्या खापरखेडा येथील बँक ऑफ इंडिया या शाखेतील ग्राहकांचा संपर्क मेळावा खापरखेडा औष्णिक विज केंद्राच्या विश्रामगृह चमरी समोरील लॉन मध्ये बँकेचे ग्राहक, कंत्राटदार व कंत्राटी कामगारांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बँक ऑफ इंडियाच्या नागपूर विभागाचे क्षेत्रीय उपमहाव्यवस्थापक जय नारायण होते. तर प्रमुख अतिथी म्हणून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे लेखा विभागाचे उपमहाव्यवस्थापक नंदकिशोर सातकर, खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड, खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे महासचिव दिवाकर घेर, ज्येष्ठ कंत्राटदार व सामाजिक कार्यकर्ते शांताराम गावंडे आदी मान्यवर मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी बँक ऑफ इंडियाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या शासकीय व बँकेच्या अनेक विविध लाभदायिक योजनांच्या माहितीचे स्क्रीनवर सादरीकरण करून सर्व योजनांचे लाभ ग्राहकांनी घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बँकेचे व्यवहार करताना येणाऱ्या अनेक समस्या, अडचणी व तक्रारी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. उपस्थित अधिकाऱ्यांनी मांडलेल्या सर्व अडचणी व समस्यांचे निराकरण केले. तसेच या परिसरातील औष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत कंत्राटदारांना व कंत्राटी कामगारांना शासकीय व बँकेच्या अनेक विविध योजनांचा लाभ मिळून देण्याचे आश्वासन दिले. मेळाव्याच्या प्रास्ताविकात बँक ऑफ इंडियाच्या खापरखेडा शाखेचे मुख्य व्यवस्थापक हेमंत राक्षे यांनी शाखेतील सर्व व्यवहारांची व प्रगतीची विस्तृत माहिती दिली. सूत्रसंचालन रित्विज दफ्तरी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अमिता मिश्रा यांनी मानले.

### साईबाबा देवघर येथे श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन



**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.१९, पालम (परभणी) :** पालम शहरातील श्री संत मोतीराम महाराज नगर येथील श्री साईबाबा देवघर येथे श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प नारायण महाराज पालमकर यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत महापुराणाचे कथेचे निरूपण होणार आहे. दि.२४ डिसेंबर पासून ते ३० डिसेंबर पर्यंत दुपारी एक ते पाच या वेळेत महापुराण कथा चालणार आहे. मंगळवार, दि.३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी एक वाजता श्रीमद् भागवत महापुराण कथेची सांगता होईल व त्यानंतर महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. कथेचे यजमान गजानन शंकरराव नारलावार, बाजीराव विठ्ठलराव चव्हाण व बंडूकाका कळंबे असणार आहेत. पालम शहर व परिसरातील सर्व भाविक भक्त मंडळींनीभागवत महापुराण कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. अशी विनंती आयोजक पदुदेवा जोशी पालमकर यांनी केली आहे.

### भाईंदर पूर्वेला शिव धाम १ तलाव रोड इमारतीत बिबटयाचा कहर



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१९, मिरा भाईंदर :** दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ७ वाजता भाईंदर पूर्वेला शिव धाम १ तलाव रोड इमारतीत बिबट्याचा कहर ७ जण बिबटया ने जखमी केले. सर्वांना तातडीने टेम्बा येथील पालिका रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. जागेवर महानगरपलीकचे आयुक्त व स्थानिक आमदार नरेंद्र मेहता व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित होते. जो पर्यंत बिबट्या जेरबंद झाला नाही. तोपर्यंत पालिकेच्या कामावर लक्ष ठेवून होते. मिरा-भाईंदर परिसरातील दाट लोकवस्तीत बिबट्याचा हल्ला होणे हे प्रशासनाचे घोर अपयश असल्याची टीका युवक काँग्रेसचे प्रवक्ते रविंद्र खरात यांनी केली आहे. अशा घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, आता घरातसुद्धा माणसे सुरक्षित राहिली नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. स्थानिक प्रशासन, वनविभाग तसेच लोकप्रतिनिधी यांच्या निष्काळजीपणामुळेच अशा घटना घडत असल्याचा आरोप त्यांनी केला. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याआधी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा युवक काँग्रेसकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ही त्यांनी दिला.

### भाईंदर पूर्वेच्या तलाव रोड परिसरात बिबट्या शिरला

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१९, भाईंदर (ठाणे) :** दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळच्या सुमारास भाईंदर पूर्वेच्या तलाव रोड परिसरात बिबट्या शिरल्याची माहिती मिळताच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पोहोचून वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित केले. हा बिबट्या येथील पारिजात इमारतीमध्ये शिरला होता. त्यानी एका कुटुंबातील तीन जणांवर हल्ला करून त्यांना जखमी केले.जखमी व्यक्तींना पंडित भीमसेन जोशी टेंबा रुग्णालयात पुढील उपचार घेण्यासाठी दाखल केले. सर्व जखमींची रुग्णालयात जाऊन विचारपूस केली आणि त्यांना आवश्यक उपचार तातडीने मिळावेत. यासाठी सूचना केली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या बिबट्याला ७ तासाच्या थरारानंतर अत्यंत शिताफीने जेरबंद केले. याप्रसंगी स्थानिक नागरिकांनी दाखवलेले प्रसंगवधानचे कौतुक करावे. तेवढे कमीच आहे. हा बिबट्या परिसरात थैमान माजवत असतांना येथील नागरिकांनी त्याला एका घरात कोंडले. त्याचप्रमाणे ज्या कुटुंबावर हल्ला झाला. त्यांना देखील वाचवले. अशा प्रकारचे वन्य प्राण्यांचे मानवी वस्तीपर्यंत पोहोचणे ही एक अत्यंत चिंताजनक गोष्ट आहे. असे प्रसंग वारंवार होऊ नयेत. यासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.